
# महाराष्ट्र शासन

# सार्वजनिक बांधकाम विभाग




# नागरिकांची सनद - २०१२

**कार्यकारी अभियंता**
**मार्ग प्रकल्प विभाग,**
**कोंकण भवन, नवी मुंबई.**

# नागरिकांची सनद - २०१२

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ ते ३ |
| २ | विभागीय कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ४ ते ५ |
| ३ | विभागीय कार्यालयाची रचना | ५ ते ६ |
| ४ | विभागाची कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ६ ते ७ |
| ५ | विभागीय कार्यालयाचे अंतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण | ७ ते ८ |
| ६ | विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता | ८ |
| ७ | गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी | ८ ते १० |
| ८ | सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद | १० ते ११ |
| ९ | परिशिष्ट अ, ब, क | ११ ते १४ |

# नागरिकांची सनद

## मार्ग प्रकल्प विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई

## १.प्रस्तावना

मार्ग प्रकल्प विभाग, कोंकण भवन हे सा.बां.खात्याचे कार्यालय सी.बी.डी. बेलापूर येथील प्रशासकीय इमारतीच्या विस्तारीत ६ व्या मजल्यावर कार्यरत असून, सा.बां. प्रादेशिक विभाग, मुंबई यांचे अधिपत्याखाली ठाणे जिल्हयासाठीच्या ठाणे (सा.बां.) मंडळाअंतर्गत नव्याने प्रस्तावित रस्ते व पूलांचे सर्वेक्षण करणे, जलशास्त्रीय अहवाल तयार करणे व संकल्प चित्र मंडळाकडून सर्वसाधारण आराखडा तयार करून घेणे व संबंधित विभागास उपलब्ध करून देणे. अतिवृष्टीमुळे पुरग्रस्त झालेल्या पुलांची उंची वाढवणेसाठी पुन्हा सर्वेक्षण अहवाल तयार करणे इत्यादी कामे या विभागामार्फत केली जातात.

नागरिकांचे या विभागाशी निगडीत प्रश्न तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक सोडविण्यासाठी मार्ग प्रकल्प विभाग कटीबद्ध आहे. ही बांधिलकी या सनदेद्वारे जाहीर करण्यात येत आहे व नागरिकांचे प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडविण्याचा दृष्टीकोन ठेवून नागरिकांची ही सनद तयार करण्यात येत आहे.

संपूर्ण ठाणे जिल्हा हा मार्ग प्रकल्प विभागाचे कार्यक्षेत्र आहे. तसेच या विभागांतर्गत असणारे पूल पाहणी उप-विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यक्षेत्र संपूर्ण कोंकण प्रदेश असे आहे. नागरिकांच्या या सनदेमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१) ठाणे जिल्हयातील रस्ते विकास योजनेतील नवीन रस्ते व पुलांचे सर्वेक्षण करून अहवाल तयार करणे.

२) कार्यक्षेत्रातील जुन्या पुलांची पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर पाहणी करून निरीक्षण अहवाल तयार करणे व दुरूस्ती विषयक माहिती संबंधित विभागांना देणे.

३) कार्यक्षेत्रातील महापालिका/नगरपालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांना तसेच इतर सर्व विभागांना तांत्रिक सल्ला देणे.

४) कार्यक्षेत्रातील विकास कामांचे प्रकल्प अहवाल तयार करणे.

५) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करून देणे.

६) विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

७) कार्यालयाच्या कामकाजात सातत्य, तत्परता ठेवून आधुनिकता आणून या विभागाची व सा.बां. विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

८) विभागीय व उपविभागीय कार्यालये संगणकीकृत करून तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.


९) विभागांतर्गत अद्ययावत माहिती सा.बां. विभागाच्या www.mahapwd.com या संकेतस्थळावर उपलब्ध करणे.

१०) विभागाच्या कार्यक्षेत्रात उद्‌भवणाऱ्या आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकी संबंधिची व जनहितार्थ आवश्यक कामे तत्परतेने करणे.

११) विभागीय व उपविभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या फलकावर जाहिररीत्या प्रदर्शित करणे.

१२) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिद्धी देणे.

या विभागाचे कार्यक्षेत्र दर्शविणारा नकाशा सोबत जोडण्यात येत आहे.




कार्यकारी अभियंता
मार्ग प्रकल्प विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई
यांचे कार्यक्षेत्र दर्शविणारा नकाशा

# २. मार्ग प्रकल्प विभाग - कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी

## १. विभागीय कार्यालयाची बांधिलकी :-

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना मार्ग प्रकल्प विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) कार्यप्रणालीत पारदर्शकता व सेवाभाव ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे/प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देईल.

## २. नागरिकांची जबाबदारी :-

- शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक व सहकार्याची असावी.
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्र परिपूर्णरित्या मिळावीत.
- नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

- विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
- सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.
- नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.
- नद्यांजवळील स्थानिक नागरिकांनी दरवर्षीची नद्या-नाले यांची महत्तम पूर पातळी / साधारण पूर पातळी इत्यादीबाबत विभागाला माहिती द्यावी.

## **३. विभागीय कार्यालयाची रचना**

या विभागाचे कार्यालय प्रमुख कार्यकारी अभियंता हे आहेत. कार्यकारी अभियंता यांच्या अखत्यारीत एकूण पाच (५) उपविभाग कार्यरत आहेत, ते खालीलप्रमाणे आहेत.

१) मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.१, ठाणे

२) आदिवासी मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.२, ठाणे

३) मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.३, कोंकण भवन, नवी मुंबई.

४) मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.४, कोंकण भवन, नवी मुंबई.

५) पूल पाहणी उपविभाग, कोंकण भवन, नवी मुंबई.

या कार्यालयाकडून ठाणे जिल्हयातील पुलांचे व रस्त्यांच्या सर्वेक्षणाची व पावसाळयापूर्वी व नंतर ३० मीटर पेक्षा जास्त लांबीच्या पुलांची पाहणीची कामे केली जातात. (परिशिष्ट-‘ क ’)

या अनुषंगाने संकल्पचित्र मंडळ, मेरीटाईमबोर्ड व इतर कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, भूमी निरिक्षक व इतर मंडळांतर्गत कार्यालयाशी समन्वय साधून कामे केली जातात. ठाणे जिल्हयाची रस्ते विकास योजना तयार करणे या कामी मार्ग प्रकल्प विभाग समन्वय कार्यालय म्हणून काम पाहते.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा ‘‘सार्वजनिक बांधकाम विभाग’’ पुरवित असतो. या विभागांतर्गत कामांच्या अमंलबजावणीसाठी सा.बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन या कार्यालयाकडून व अधिकाऱ्यांकडून केले जाण्याची पराकाष्ठा केली जाते.

## **४. विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र :-**

ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे या कार्यालयाचे कार्यक्षेत्र ठाणे जिल्हयातील एकूण १५ तालुक्यात विखुरलेले आहे. ठाणे जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र एकूण ९,५५८ चौ.कि.मी. असून १६६.१० कि.मी. सागरी किनारपट्टी आहे. या विभागाचा चार लोकसभा व चोवीस विधानसभा मतदारसंघांशी संबंध येतो.

कार्यक्षेत्राशी पाच विधान परिषदेचे सदस्य निगडित आहेत. लोकसभा/विधानसभा/ विधान परिषद सदस्य यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडीत असलेली मतदार संघातील सर्वेक्षणाची कामे प्राधान्याने आवश्यकतेनुसार व मंजूर अनुदानाच्या अधीन राहून हाती घेण्यात येतात.

मार्ग प्रकल्प विभाग अंतर्गत पाच उपविभाग कार्यरत आहेत. त्यानुसार पाच उप-अभियंते त्यांच्या उपविभागीय कार्यालयाची जबाबदारी सांभाळतात. (विभाग/ उपविभाग कार्यालयाची सूची व मुख्य कार्यालये परिशिष्ट 'ब' )

मार्ग प्रकल्प विभाग, कोंकण भवन कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग, राज्यमहामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग तसेच स्थानिक क्षेत्रातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांची दर्जेनिहाय लांबी व या रस्त्यावर येणारे लहान व मोठे पूल यांचे नियमित निरीक्षण, रूंदीकरण, सुधारणा व दर्जोन्नत्तीबाबतचे आवश्यकतेनुसार सर्वेक्षण करण्यात येते. (या बाबतची सूची परिशिष्ट 'क' प्रमाणे सोबत जोडण्यात येत आहे.)

## ५. विभागीय कार्यालयांतर्गत माहितीची सुलभता व खाजगीकरण

### अ) माहितीची सुलभता :-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या वेबसाईटवरून (संकेतस्थळावरून) वेळोवेळी सादर केल्या जाणाऱ्या माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**ब) खाजगीकरण :-**

मार्ग प्रकल्प विभागाकडून फक्त रस्ते व पुलांच्या सर्वेक्षणाची कामे केली जात असल्याने खाजगीकरणातून करावयाच्या कामांचा या विभागाच्या कार्यक्षेत्रात अंतर्भाव नाही.

## ६. विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याची सुरक्षितता वाढविण्यासाठी ''अपघात निवारण समिती'' स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील ''अपघातप्रवण स्थळे'' शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

''अपघात निवारण समितीने'' या विभागाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून सुचविलेल्या अपघातप्रवण स्थळांची सुधारणा व उपाययोजना टप्प्या-टप्प्याने हाती घेण्यासाठी हा विभाग, मंडळ कार्यालयाने सुचविल्यास अशा अपघात स्थळांचे सर्वेक्षण करुन तांत्रिक अहवाल सादर करतो.

## ७. गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी.

**अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण**

नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण विहित कालावधीत करणे हे विभागाचे प्रमुख उद्दिष्ट राहील. कार्यपूर्तीस होणारा विलंब व अन्य काही गाऱ्हाणी विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील कार्यालयाबाबत अथवा विभागाअंतर्गत काही

कामाबाबत असतील तर त्यासाठी नागरिकांची ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असेल, त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी, म्हणजे उदाहरणार्थ उपविभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रारी असल्यास विभागीय कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे व विभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गाऱ्हाणे मांडावे. अशा गाऱ्हाणे/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसांत करण्यात येईल. गाऱ्हाणी/तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यात येईल.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत/पत्राने वा ई-मेलद्वारेही नागरिक मांडू शकतात.

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन**

नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा या विभागांतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येईल.

**क) जनसामान्यांकडून सूचना**

मार्ग प्रकल्प विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ८. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे कार्यालयाच्या या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी सुरु असून ती अद्ययावत करून दिनांक ०१/१२/२०१२ रोजी पुन्हा प्रसिध्द करण्यात येत आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करून आवश्यक बदल करण्यात येतील.

विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेची वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगिकारुन, ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाद्वारे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन ग्राहकांना उत्तम दर्जाची सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल, तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रारशून्य सेवा असल्याची खात्री देण्यात येईल.

## ९. परिशिष्टे

**अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता (Tree chart )**


**ब) विभागाच्या अखत्यारीत कार्यरत असणारे उपविभाग**

**क) विभागीय कार्यक्षेत्रातील मोठे पूल यांची सूची ३१/०३/२०१२ अखेर ३१० पुलांची यादी.**

# परिशिष्ट - 'अ'

**कार्यालयाचे नांव व पत्ता :- कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई.**

## *कार्यालयाचा तक्ता*



## परिशिष्ट - 'ब'

- **कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांचे अखत्यारीत कार्यरत असणारे उप-विभाग**

१) मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.१, ठाणे.
२) आदिवासी मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.२, ठाणे.
३) मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.३, कोंकण भवन, नवी मुंबई.
४) मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.४, कोंकण भवन, नवी मुंबई.
५) पूल पाहणी उपविभाग, कोंकण भवन, नवी मुंबई.

# परिशिष्ट - 'क'

## विभागीय कार्यक्षेत्रातील मोठया पुलांची सूची
## ३१/०३/२०१२ अखेर

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | मोठे पूल |
|---|---|---|
| १. | राष्ट्रीय महामार्ग विभाग, ठाणे | ५२ |
| २. | सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे | ४९ |
| ३. | बांधकाम विभाग, ठाणे | ७९ |
| ४. | सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार | ७३ |
| ५. | जिल्हा परिषद (पश्चिम) ठाणे | २८ |
| ६. | जिल्हा परिषद (पुर्व) जव्हार | २९ |
| | एकूण | ३१० |